अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरूवार, दि.९ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १३४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## मुख्यमंत्री सचिवालय कक्षातील ५८ प्रकरणे निकाली

सुराज्य/सोलापूर

लोकाभुमिक प्रशासनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सचिवालय कक्षाची स्थापना केली आहे. याकक्षावर थेट मुख्यमंत्र्यांचे लक्ष आहे. सोलापूर जिल्हास्तरीय क्षेत्रीय कार्यालयात जानेवारीअखेर एकूण ११० अर्ज प्राप्त झाले होते.

सर्व अर्ज संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आले आहेत. त्यापैकी ५८ प्रकरणांवर संबंधित विभागाकडुन कार्यवाही करण्यात आलेली असून उर्वरित ३४ प्रकरणांवर संबंधित विभागाकडून कार्यवाही प्रस्तावित आहे. तसेच एकूण १८ प्रकरणे अंतरिम आहेत. ही माहिती कक्षाच्या पदसिध्द विशेष कार्य अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली. राज्यातील सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न, शासन स्तरावर असलेली कामे त्या संदर्भात प्राप्त होणारे अर्ज, निवेदने स्वीकारुन त्यावर कार्यवाही करण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजी क्षेत्रीय स्तरावरील मुख्यमंत्री सचिवालय कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामध्ये नायब तहसिलदार अनिल निराळी व अव्वल कारकून एस. आर. चव्हाण आणि ए. बी. माळी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.



# ठेकेदाराच्या अपहरणाचा प्लॅन फसला

## चार महिला पोलिसांच्या ताब्यात

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहरातील गजबजलेल्या सात रस्ता भागात दुचाकी अडवून ठेकेदाराला मारहाण करून त्याला कारमधून पळवून नेण्याचा प्रयत्न पुण्याच्या सहा महिलांकडून झाला. परंतु बेगमपेठ परिसरात त्यांना रोखण्यात यश आल्याने अपहरणाचा प्रयत्न फसला आहे.**



याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास ठेकेदार आकाश काळे (वय-२८, रा. दक्षिण कसबा) हे आपल्या एका सहकाऱ्यासह दुचाकीवरून सातरस्ता येथून निघाले होते.त्यावेळी एक इंडिगो कार त्यांच्या गाडीला आडवी लावण्यात आली. त्यामुळे त्यांनी दुचाकी थांबवली. तेव्हा कारमधून उतरलेल्या महिलांनी त्यांना मारहाण केली आणि त्यांना कारमध्ये बसवले आणि कार रंगभवनमार्गे विजापूरवेसच्या दिशेने निघाली.

कार बेगमपेठेत आली असता काळे यांचा दुचाकीवरील सहकारी तेथे आला व त्याने आपली गाडी कारला आडवी लावली आणि कार थांबल्यानंतर त्याची चावी काढून घेतली. त्यामुळे महिलांची कार जागेवर थांबली. यावेळी महिलांनी तेथेही गोंधळ घालण्यास सुरुवात केली. रस्त्यावर बराच गोंधळ सुरू झाल्याने जेलरोड पोलीस ठाण्यातील पोलिसांनी तेथे धाव घेतली. त्यांना सर्व प्रकार समजल्यानंतर त्या महिलांना त्यांनी ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी महिला व काळे यांना सदर बझार पोलीस ठाण्यात आणले. याबाबत रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### पोलीस ठाण्यात गोंधळ अन् राजकीय पक्षाकडून दबाव

**महिलांनी पोलीस ठाणे आवारातही गोंधळ घालण्यास सुरुवात केली.त्यामुळे पोलिसांना तेथे क्यूआरटी पथकाला बोलवावे लागले.तेथील पोलिसांनी चौकशीला सुरुवात करताच त्यांच्यावर पुण्यातून एका राजकीय पक्षाकडून दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. स्थानिक कार्यकर्तेही पोलीस ठाण्यात आले होते. ठेकेदार काळे यांनी त्या महिलांना आपण ओळखत नसल्याचे पोलिसांना सांगितले,त्यामुळे त्यांना मारहाण करून त्यांना पळवून नेण्याचा या महिलांचा नेमका हेतू काय होता,हे समजू शकले नाही. यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का? याचा शोध पोलिसांकडून सुरू आहे.**

### पोलिसांनाही केली धक्काबुक्की

**कारमधून आलेल्या महिलांनी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देखील अश्लील भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की केल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. या महिला सोलापुरात कशासाठी आल्या? त्यांचा उद्देश काय असावा? त्यांची मोठी टोळी आहे का? यासंदर्भात पोलीस तपास करत आहेत.**

## कचरा डेपो परिसरातील बायोमायनिंग, सीएनडी प्रकल्पासाठी मक्तेदाराबरोबर करार

### प्रकल्प पूर्ण झाल्यास महापालिकेला उपलब्ध होणार ३८ एकर जागा



सुराज्य/सोलापूर

### दोन्ही प्रकल्पांसाठी स्वच्छ भारत अभियानांतर्गत निधी

वर्षभरात हा प्रकल्प पूर्ण झाल्यास महापालिकेच्या ५४ एकर जागेतून ३८ एकर जागा खुली होऊन विविध कामासाठी मिळणार आहे. तसेच कचरा डेपो परिसरातच खडी मुरूम विलगीकरण चे सीएनडी प्रकल्प राबविण्यात येणार असून हा प्रकल्प मक्तेदाराकडून करून घेताना २९१ रुपये प्रति टन प्रोसेसिंग खर्च येणार आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी स्वच्छ भारत अभियानांतर्गत निधीतून खर्च करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तेली- उगले यांनी दिली.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत महापालिकेच्या तुळजापूर रस्त्यावरील कचरा डेपो परिसरात बायोमायनिंग आणि खडी- मुरूम विलगीकरणाचे सीएनडी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. या दोन्ही प्रकल्पाचे मक्तेदाराकडून करार करून घेण्यात आल्याची माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

महापालिकेच्या ५४ एकर जागेत गेल्या अनेक वर्षापासून शहरातून उचलण्यात येणारा मोठ्या प्रमाणावर कचरा डंपिंग करण्यात आला आहे. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाय योजना सुरू आहेत. सध्या शहरातून उचलण्यात येणारा सुमारे ५०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. यासाठी बायो एनर्जी प्रकल्प मक्तेदारांकडून राबविण्यात येत आहे. यामधून खत आणि वीज निर्मिती सुरू आहे. मात्र गेली कित्येक वर्षापासून टाकण्यात आलेल्या मोठ्या प्रमाणावरील कचऱ्याची विल्हेवाट लावणे जिकरीचे बनले होते.

यासाठी याच परिसरात बायोमायनिंग प्रकल्प राबविण्याचा महापालिकेने निर्णय घेत आहे. यासाठी निविदा देखील काढण्यात आली होती. हा कचरा शक्य तेवढा उचलण्यात येऊन जमिनीत पुरण्यात येणार असून उर्वरित विकण्यासारखा कचरा हा विक्री देखील करण्यात येणार आहे. याचा मक्ता सागर मोटर्स यांना देण्यात आला असून प्रति टन ३९८ रुपये प्रोसेसिंग खर्च येणार आहे या संदर्भात मक्तेदाराशी करार करण्यात आल्याचे आयुक्तांनी सांगितले.


## शहरातील पाणीपुरवठा शुक्रवारपासून ३ ऐवजी ४ दिवसानंतर होणार

### स्काडा नियंत्रण प्रणालीचे कामासाठी वेळोवेळी राहणार शटडाऊन!

सुराज्य/सोलापूर

सोलापूर स्मार्ट सिटी योजने अंतर्गत, स्काडा नियंत्रण प्रणालीचे काम प्रगतिपथावर आहे. ही कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी शटडाऊन राहणार असून यामुळे सोलापूर शहरातील पाणीपुरवठा दि. १० फेब्रुवारी २०२३ ते पुढील २५ दिवसापर्यंत ३ ऐवजी ४ दिवसानंतर होणार आहे. ४ दिवसाआड होणाऱ्या पाणी पुरवठ्यात कोणताही बदल होणार नाही, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली.

सोलापूर स्मार्ट सिटी योजने अंतर्गत, स्काडा नियंत्रण प्रणालीचे काम प्रगतिपथावर असून या योजनेअंतर्गत उजनी जलवाहिनी, पाकणी जलशुद्धीकरण केंद्र, सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्र, भवानी पेठ



जलशुद्धीकरण केंद्र व टाकळी जलवाहिनी येथे विविध प्रकारचे उपगांची कामे प्रस्थावित आहे. ही कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी शटडाऊन राहणार आहे. यामुळे सोलापूर शहरातील पाणीपुरवठा दि.१० फेब्रुवारी २०२३ ते पुढील २५ दिवसापर्यंत ३ ऐवजी ४ दिवसानंतर होणार आहे. ४ दिवसाआड होणाऱ्या पाणी पुरवठ्यात कोणताही बदल होणार नाही. दरम्यान, या कालावधीत पाणी पुरवठा चार दिवसाआड नंतर देखील उशिरा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी केले आहे.

## आता विशेष अभय योजना नाहीच; थेट जप्तीची कारवाई

### वसुलीसाठी अधिकची पथके तैनात

सोलापूर : महापालिका प्रशासनाकडून मिळकत कर वसुली मोहीम आता आणखी तीव्र करण्यात येणार आहे, दरम्यान यापुढे आता मिळकत कर संदर्भात विशेष अभय योजना जाहीर करण्यात येणार नाही तर थेट जप्ती व वसुलीची मोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी अधिकचे विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. त्याचबरोबर झोन कार्यालयाकडूनही कर्मचाऱ्यांची या कामासाठी नियुक्ती करण्यात येणार आहे असे महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या मिळकत कराची मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. ही थकबाकी वसूल व्हावी या दृष्टीने नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात शहरातील मिळकतदारांना त्यांच्या थकबाकी करातील लावण्यात आलेली शास्ती, दंड आणि नोटीस फी यामध्ये ८० टक्के सूट देणारी विशेष अभय योजना जाहीर करण्यात आली होती. ही संधी देऊन देखील आणखी दीड लाखांवर मिळकतदारांनी आपला थकीत कर भरला नाही. यामुळे आता मार्च अखेरपर्यंत मिळकती जप्ती आणि वसुलीची मोहीम कडक करण्यात येणार आहे. यासाठी अधिकचे विशेष वसुली पथके तयार करण्यात आली आहेत. लवकरच ही मोहीम सुरू करण्यात येणार असल्याने यापुढे आता मिळकतदारांना कोणतीही अभय योजना जाहीर करण्यात येणार नसल्याचे आयुक्त तेली-उगले यांनी स्पष्ट केले.

## निमगाव (म) ग्रामपंचायतीत २० हजारांचा अपहार

सोलापूर : बनावट पावती पुस्तकाद्वारे ग्रामस्थाकडून २२ हजार ८०६ रुपयाचा कर वसूल करून त्याचा अपहार केल्याची घटना माळशिरस तालुक्यातील निमगाव (मगर) येथे नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात वेळापूरच्या पोलिसांनी ग्रामपंचायत कार्यालयातील शिपाई अफसर अल्लाउद्दीन शेख (रा.निमगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अफसर शेख हा मगराचे निमगाव ग्रामपंचायत कार्यालयात शिपाई म्हणून कामास होता. त्याने डिसेंबर २०२१ च्या पूर्वी गावातील ग्रामस्थांकडून कर वसूल केला होता. आणि त्यांना बनावट पावती दिली होती. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर ग्रामसेवक अधिकारी कैलास बळीराम सुरवसे (रा.वेळापूर) यांनी नुकतीच पोलिसात तक्रार दाखल केली. पुढील तपास फौजदार राऊत करीत आहेत.

## होटगी रोड येथे जेवणाच्या कार्यक्रमात चाकूने हल्ला

सोलापूर : होटगी रोडवरील रद्दी कारखान्याजवळ असलेल्या रेल्वे पटरीजवळ चाकूने केलेल्या मारहाणीत शिवाजी बापू पवार (रा. साखर कारखाना होटगी रोड) हा तरुण जखमी झाला ही घटना घडली. शिवाजी बापू हा रेल्वे रुळाजवळ जेवणाच्या कार्यक्रमासाठी गेला होता. त्यावेळी पवार याने किरकोळ कारणावरून त्याला चाकूने मारहाण केली. त्याला उच्चारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



खळबळ!!!

कल्याण
780-53-238

मेन बाजार
257-48-990

## परिवहनच्या पेन्शनधारकांनी न्यायासाठी फोडला टाहो

### प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हाप्रमुखाला घातले साकडे

सोलापूर : गेल्या तीन वर्षापासून महागाई भत्ता आणि सातव्या वेतनापासून वंचित ठेवल्याने सोलापूर महापालिका परिवहन खात्यातील ६९४ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला आहे. औषध गोळ्यांसाठी पैसे नाहीत. आम्ही जगावे कसे? असा टाहो फोडत वयोवृद्ध पेन्शनधारक शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्यासमोर ढसाढसा रडले. प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांना साकडे घालण्याची विनंती केली.

परिवहन विभागातील ६९४ निवृत्त कर्मचारी गेल्या तीन वर्षांपासून कुठलेही महागाई भत्ता पासून वंचित आहेत. ७ व्या वेतनापासून आम्हांला डावलले गेले जात आहे. पैशा अभावी जीवन जगणे अवघड झाले आहे. पेन्शन नसल्यामुळे आम्ही मानसिक दडपणाखाली जगत आहोत. याबाबत चौकशी केली असता परिवहनचे उत्पन्न कमी आहे. त्यामुळे देता येत नाही असे सांगत हाकलून दिले जात आहे. आम्ही काम केलेल्या घामाचा दाम आहे. हक्काचे पैसे असताना अधिकाऱ्यांकडे भीक मागावी लागत आहे. एके काळी आम्ही परिवहन विभागात असताना सोन्याचा धूर निघत असे. परिवहन विभागाकडून महापालिकेस आर्थिक मदत केली जात असे. आम्ही जीवाचे रान करत काम केल्यामुळे ही चांगली परिस्थिती होती. त्याचे फळ आता मिळत नाही. हेलपाटे मारून जीव कासावीस झाला आहे. त्यामुळे आता तुम्हींच न्याय देऊ शकता. त्यावेळी बाळासाहेबांची शिवसेना गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांचे कार्यालय भावनिक झाले होते. सर्व वयोवृद्ध वडीलधाऱ्या व्यक्तींना दिलासा देत मागण्या रास्त असल्याचे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत बैठक घेण्याचे अभिवचन अमोल शिंदे यांनी दिले तर त्याचा पहिला टप्पा म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची सर्व वयोवृद्ध पेन्शनधाराकांना घेऊन भेट घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.



> कुटुंब निवृत्ती वेतनसाठी पालिकेकडून परिवहन सेवानिवृत्त सेवकांचे दर माहे पेन्शन रक्कम पालिकेकडून अदा करण्यासाठी प्रत्येक वर्षी रक्कम देण्याकरीता अंदाजपत्रकात १० कोटींची तरतूद करण्यात येते. प्रत्यक्षात अंमलबजावणी केली जात नाही, असे सांगत काही जण रडत रडत सांगत होते.
>
> वयोवृध्द परिवहन कर्मचाऱ्यांची अवस्था बिकट आहे. सर्व कर्मचाऱ्यांनी येऊन त्यांची कैफित मांडली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत चर्चा करून पाठपुरावा केला जाईल आणि वयोवृध्द असलेल्या कर्मचाऱ्यांना बिकट व्याधी असलेल्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळवून दिली जाईल.
>
> **- अमोल शिंदे (जिल्हाप्रमुख बाळासाहेब ठाकरे शिवसेना)**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: मौजे नागोबाचीवाडी व ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी हद्दीतील शेतजमीन तिचे वर्णन- गट नं. १११/५ क्षेत्र ०२ हे. ०० आर. आकार ०० रु. ६० पैसे यांसी चतु:सिमा - पूर्वेस गट नं. ५१, ४९, दक्षिणेस- गट नं. ११२/१, पश्चिमेस- गट नं. ११०, १०९, १०८ व उत्तरेस- गट नं. ५७. येणेप्रमाणे शेतजमीन यामध्ये एक चालू पाण्याची विहीरीसह, आतील झाडझुडूप, दगडमाती वगैरे सर्व तदंगभुत वस्तूसह.

वर नमुद शेतजमीन रेकॉर्डला संदिप विश्वंभर पंढरे, रा. नागोबाचीवाडी, ता. बार्शी यांचे नांवे दाखल असून सदरची शेतजमीन त्यांचे वडिलोपार्जित मालकीची व कब्जेवहीवाटीची आहे. त्यांनी सदर मिळकत आमचे आशिलास विक्री करणेचा ठराव करून आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम स्विकालेली आहे. सदरची मिळकत मिळकतीचे मालकानी निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा आमचे आशिलास दिलेला आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, संदिप विश्वंभर पंढरे यांचेशी इतर कोणाचा वरील नमूद मिळकतीबाबत खरेदी, साठेखत, गहाण, दान, लिज, बोजा, चोळीबांगडी, पोटगी इ. प्रकारचा कसल्याही प्रकारे हस्तांतरणाबाबत व्यवहार असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत खालील नमुद पत्यावर कागदपत्रानिशी आमचे आशिलास शहानिशा करून द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची हरकत न आल्यास आमचे आशिल वर नमुद ठरादाप्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागावून कोणाची तक्रार चालणार नाही कोणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. कळावे, ता. ०८/०२/२०२३

सही/-
आशिल

सही/-
श्री.एस.एस. ठोंबरे,
(अॅडव्होकेट), सुयश निवास,
फुले प्लॉट, बार्शी, मो.नं.९३७११६२४२५
अशिल - राजेंद्र सुखदेव मिरगणे,
मो.नं.९४२२६४४३००, रा.२५११,
तेलगिरणी चौक, बार्शी तर्फे अॅडव्होकेट